

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

जून २०२६

# विद्यावार्ता

ई - मासिक




## ई-मासिक

# विद्यावार्ता

विश्वास • गुणवत्ता • ज्ञान • माहिती प्रसार

## निरंतरतेची ४ वर्षे



# विद्यावार्ता
ई - मासिक


# अनुक्रमणिका


- संपादकीय १
- विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा २
- विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा पदवी वितरण समारंभ संपन्न ९
- विद्यापीठात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त व्याख्यान संपन्न १३
- विद्यापीठात बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा १५
- विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सन्मानपूर्वक निरोप १८
- लेख-आण्विक निदानः संसर्गजन्य रोगांविरूध्दच्या लढ्यातील एक शक्तिशाली शस्त्र... २१
- जयंती विशेष ३९
- बातमी कात्रणे ३२





संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मार्गदर्शक

डॉ. मिलींद बारहाते

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

डॉ. महेंद्र ढोरे

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रकाशक

डॉ. अविनाश असनारे

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संपादक

डॉ. विलास नांदुरकर

जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

https://www.sgbau.ac.in
E-mail-pro@sgbau.ac.in




संपादकीय

# ई–विद्यावार्ता प्रवासाची यशस्वी चार वर्षे

प्रियवाचक आणि विद्यापीठ परिवार,

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने जनसंपर्क विभागाच्या माध्यमातून दरमहा प्रकाशित होणाऱ्या 'ई–विद्यावार्ता' या मासिक अंकाला जून, २०२६ मध्ये यशस्वी चार वर्षे पूर्ण होत आहेत. २०२२ मध्ये व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयानुसार सुरू झालेला हा प्रवास आज एका महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे.
या मासिकाच्या सातत्यपूर्ण प्रकाशनामध्ये तत्कालीन मा. कुलगुरू स्व. डॉ. दिलीप मालखेडे, मा. प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, डॉ. विजय माहेश्वरी आणि विद्यमान मा. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे मोलाचे सहकार्य व लाभलेले मार्गदर्शन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे.

विद्यापीठाचे विविध संशोधन, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम, विद्यार्थ्यांची व विभागांची उपलब्धी, प्राधिकरणांचे निर्णय तसेच विविध कार्यक्रमांची माहिती छायाचित्रांसह या मासिकात आकर्षक रीत्या समाविष्ट केली जाते. उत्कृष्ट डिझाईन, देखणे मुखपृष्ठ, नेटकी सजावट आणि उपयुक्त माहिती यांमुळे हा अंक सर्वांचेच लक्ष वेधून घेतो. महाराष्ट्र राज्यातील सर्व राज्य विद्यापीठांमध्ये नियमितपणे प्रकाशित होणारा हा एकमेव अंक ठरला असून, सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांची माहिती यात असल्याने तो सर्वांकडून आवर्जून जतन केला जातो.

हा अंक विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईटवर नियमितपणे उपलब्ध करून दिला जातो. इतकेच नव्हे तर, आजवर प्रकाशित झालेल्या सर्व अंकांचा संग्रह देखील वेबसाईटवर उपलब्ध आहे. या निमित्ताने विद्यापीठाच्या सर्व विभागांच्या उपक्रमांचा आणि उपलब्धींचा एक महत्त्वपूर्ण डेटा तयार झाला असून, आगामी काळात नॅक (NAAC) आणि संशोधनाच्या दृष्टीने हा डेटा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

जून, २०२६ च्या या विशेष प्रसंगी संपादक या नात्याने संवाद साधताना अत्यंत आनंद होत आहे.मा. कुलगुरंच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक अंकाचे मुखपृष्ठ एका विशिष्ट संकल्पनेवर (थीम) आधारित तयार करण्यासाठी जनसंपर्क विभागाची चमू अहोरात्र मेहनत घेते. यामध्ये डिझाईनर श्री गवई, जनसंपर्क विभागातील श्री ओम जगताप आणि श्री प्रल्हाद खांडेकर यांचे तांत्रिक व व्यवस्थापकीय सहकार्य लाभत आहे, ज्यामुळे हा अंक ऑनलाईन पध्दतीने सर्वांपर्यंत पोहोचत आहे.

विद्यापीठाचे विद्यमान मा. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे आणि प्रकाशक तथा कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या अविरत व मोलाच्या मार्गदर्शनामुळेच दर महिन्याचा अंक अधिकाधिक दर्जेदार आणि वैशिष्ट्यपूर्ण होत आहे.

वाचकांकडून मिळणारा उत्तम प्रतिसाद हाच आमच्या कामाचा मुख्य हुरूप आहे. भविष्यातही हा अंक विद्यापीठाच्या प्रगतीचा आरसा बनून असाच अविरत सुरू राहील, हा विश्वास!
आपल्या सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद!



**डॉ. विलास नांदुरकर**
संपादक, ई–विद्यावार्ता
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# वृक्ष लागवडच नाही ; संगोपनाचाही संकल्प करा – प्र-कुलगुरू

## विद्यापीठात जागतिक पर्यावरण दिनी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचे हस्ते वृक्षारोपण



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शुक्रवार दि. ५ जून, २०२६ रोजी विद्यापीठ परिसरात परीक्षा विभागाकडे जाणा–या नवीन रस्त्याच्या दुतर्फा प्रतिकात्मक म्हणून तीस निंबाच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी विद्यार्थ्यांना संदेश देतांना केवळ वृक्षलागवडच नाही, तर वृक्ष संगोपनाचा देखील संकल्प करा, असे आवाहन केले.

विद्यापीठ परिसरात आजघडीला जवळपास पाच लक्ष वृक्ष आहेत. तर विद्यापीठाच्या उद्यान विभागाच्यावतीने पावसाळ्यात एक हजार वृक्षांची लागवड करण्यात येणार असून विद्यापीठ परिसरात हजारो सीड्स बॉल विद्यार्थ्यांच्या माध्यमातून टाकण्यात येणार आहे.

प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे विद्यार्थ्यांना संदेश देतांना म्हणाले, तरुण पिढी म्हणून तुमच्याकडे ऊर्जा आणि नवीन विचार आहेत, जे या पृथ्वीला अधिक सुंदर बनवू शकतात. पर्यावरण रक्षणाची सुरुवात खूप मोठ्या गोष्टींमधूनच व्हायला हवी असे नाही, तर आपल्या दैनंदिन जीवनात बदल करूनही मोठे योगदान देऊ शकतो. आपल्या कॅम्पसमध्ये, घर – परिसरात प्लास्टिकचा वापर टाळा, ऊर्जा, पाणी बचत करा, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

वृक्षारोपण कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, उपकुलसचिव सौ. मोनाली तोटे पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, सहा. कुलसचिव डॉ. विरेंद्र निमजे, श्री अनिल मेश्राम,



प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नंदुरकर, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे, भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. यादवकुमार मावळे, बायोटेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे, डॉ.जी.जी. मुळे, उद्यान अधीक्षक श्री भिमराव वाठोरे तसेच विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. वृक्षारोपण कार्यक्रमाकरीता अभियांत्रिकी व उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतलेत.





## वृक्षारोपण करतांना... क्षणचित्र







## वृक्षारोपण करतांना... क्षणचित्र







# वृक्षारोपण करतांना... क्षणचित्र







## वृक्षारोपण करतांना... क्षणचित्र







# वृक्षारोपण करतांना... क्षणचित्र







# आजीवन अध्ययन विभागाचे सर्वच अभ्यासक्रम रोजगारभिमुख - विभागीय आयुक्त नयना गुंडे

## विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा पदवी वितरण समारंभ संपन्न



विभागीय आयुक्त श्रीमती नयना गुंडे मार्गदर्शन करतांना

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे सर्वच अभ्यासक्रम रोजगारभिमुख आहेत, असे उद्गार अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांनी काढले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या पदवी वितरण समारंभात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रमुख अतिथी म्हणून अधिसभा सदस्य डॉ. संतोष कुटे, डॉ. प्रशांत विघे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

श्रीमती गुंडे पुढे बोलतांना म्हणाल्या, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या रोजगारभिमुख अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी शिकून लवकरच आपला रोजगार मिळवू शकतात आणि आपण जे शिकतो, त्याच्या आधारे रोजगारही मिळाला पाहिजे. आपला प्रशासकीय सेवेतील अनुभव सांगतांना विद्यार्थीनींनी प्रशासकीय सेवेकडे वळावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ उन्हाळी–२०२५ परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीतील प्राविण्यप्राप्त विद्यार्थी कु. पुनम राठी, अपूर्वा इंगळे, कविता पडोळे, अंजली उमाळे, प्रीती क्षीरसागर, प्रतीक्षा खैरे, अश्विनी कोळमकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. अर्चना ढोरे यांनी पदविकांक्षींना सादर केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभाग अंतर्गत एम.ए.योगशास्त्र, आजीवन अध्ययन व विस्तार, एम. ए. छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा व व्यवस्थापन, समुपदेशन व मानसोपचार या पदव्युत्तर पदवीकांक्षींना, तर योगथेरपी, इंग्रजी संवाद कौशल्य, मानसोपचार व निसर्गोपचार व योगशास्त्र पदवीकाकांक्षींना त्या विभागाचे समन्वयक प्रा. स्वप्निल मोरे, प्रा. राम मिश्रा, डॉ. भैय्यासाहेब चिखले, प्रा. राधिका खडके, प्रा. अलका ब्राम्हणकर, प्रा. आदित्य पुंड यांनी पदविकांक्षींना सादर केले व त्यांचा पदवी देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



अध्यक्षीय भाषण करतांना प्र–कुलगुरू डॉ.महेंद्र ढोरे

अधिसभा सदस्य डॉ. संतोष कुटे म्हणाले, नावाप्रमाणेच आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे काम सुरू आहे व महाराष्ट्रभर त्याचा नक्कीच विस्तार होईल. एवढेच नाही, तर डॉ. श्रीकांत पाटील यांचे विचार व स्वप्न देखील या माध्यमातून ते पूर्ण करीत आहेत. विद्यार्थ्यांनी सुध्दा प्रयत्नांची पराकाष्ठा करुन यश संपादन करावे, असा मोलाचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. डॉ. प्रशांत विघे म्हणाले, डॉ. श्रीकांत पाटील यांच्या आजीवन अध्ययन विभागाचा महाराष्ट्रभर नावलौकीक होत असून विभागाचे काम सुध्दा अतिशय दर्जेदार व रोजगारभिमुख असल्याचे सांगून पदवीकांक्षींना शुभेच्छा दिल्यात.

अध्यक्षीय भाषण करतांना प्र–कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे यांनी सर्वप्रथम आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील पदविका व पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ते पुढे म्हणाले, सर्व विद्यार्थी भाग्यवंत आहेत. नवीन विद्यापीठ कायद्यानुसार आता महाविद्यालय व विद्यापीठ विभाग स्तरावरील विद्यार्थ्यांना सन्मानपूर्वक पदवी दिली जाते, याचा मला खूप आनंद होतो. सर्व पदवीप्राप्त व पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना त्यांनी पुनश्च शुभेच्छा दिल्यात.

सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे बाब यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने झाली. प्रास्ताविक आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. याप्रसंगी मान्यवरांचे स्मृतिचिन्ह व रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी माझी वसुंधरा पर्यावरण पूरक अभियानांतर्गत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उपस्थितांना प्रतिज्ञा देण्यात आली. संचालन प्रा. आदित्य पुंड व डॉ. अनघा देशमुख यांनी, तर आभार डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी मानले. पदवी वितरण कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत चालविल्या जाणा–या सर्व अभ्यासक्रमांचे समन्वयक, पदवीधारक विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक उपस्थित होते.




पदवी वितरण करतांना विभागीय आयुक्त श्रीमती नयना गुंडे व मान्यवर

## विद्यार्थ्यांना पदवी वितरण करतांना मान्यवर












कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थीनी









पदवी वितरण करतांना मान्यवर



# शिवरायांचे विचार आचरणात आणणे हिच खरी मानवंदना - प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

## विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त व्याख्यान संपन्न




अध्यक्षीय भाषण करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

'छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि त्यांची कार्यशैली केवळ विशिष्ट दिनापुरती मर्यादित न ठेवता, ती आपण आपल्या दैनंदिन आचरणात आणली पाहिजे, आणि हाच वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवला पाहिजे. जगभरातील व्यवस्थापन तज्ज्ञांसाठी महाराजांची धोरणे आजही मार्गदर्शक ठरत आहे. याच व्यापक दृष्टिकोनातून लेखक शुभम विलासराव पाचखंडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज विचारधारा आणि व्यवस्थापन या पहिल्या संदर्भ ग्रंथांचे ग्रंथाचे लेखन केलेले होते. 'विद्यापीठाची माजी विद्यार्थिनी आज याच व्यासपीठावर मुख्य व्याख्याता म्हणून सन्मानाने उभी राहते, याचा विद्यापीठाचा प्र–कुलगुरू म्हणून मला सार्थ अभिमान वाटतो, असे प्रतिपादन प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने 'शिवराज्याभिषेक दिन सोहळा' अत्यंत उत्साहात आणि प्रेरणेच्या वातावरणात संपन्न झाला. याप्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. यावेळी त्यांनी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनापासून अभिनंदन केले. हा विभाग अत्यंत ऊर्जावान असून वर्षभर अत्यंत दर्जेदार व मार्गदर्शक कार्यक्रमांचे आयोजन करतो, असेही ते म्हणाले. व्यासपीठावर प्रमुख व्याख्याता म्हणून प्रसिध्द शिवव्याख्याता ॲड. वैष्णवी हागोणे, व्य.प. सदस्य डॉ. अरुण हरणे, ननसा संचालक डॉ. अजय लाड, अधिसभा सदस्य डॉ. श्रीकांत काळीकर, उपविभागीय अधिकारी श्री आशिष बिजवाल, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते.

**शिवरायांचे विचार आजही मार्गदर्शक – ॲड. वैष्णवी हागोणे**

'छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक ही केवळ एक ऐतिहासिक घटना नसून, ती या देशातील सामान्य जनतेला मिळालेली स्वाभिमानाची आणि स्वातंत्र्याची मोठी सनद होती. त्यांचे विचार, स्त्रीविषयक दृष्टिकोन आणि त्यांचे गडकिल्ले व्यवस्थापन आजही तरुण पिढीसाठी तितकेच मार्गदर्शक आणि अनुकरणीय आहे,' असे प्रतिपादन ॲड. वैष्णवी हागोणे यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापन कौशल्याचा, लोककल्याणकारी राजा म्हणून त्यांच्या धोरणांचा आणि न्यायव्यवस्थेचा प्रकर्षाने वेध घेतला.




विषयाची मांडणी करतांना व्याख्याता ॲड. वैष्णवी हागोणे

शिवरायांचे शेतकरी हित, महिलांप्रती असलेला आदर, त्यांची विज्ञाननिष्ठा आणि सर्वधर्मसमभावाची वृत्ती यावर त्यांनी व्याख्यानाच्या माध्यमातून प्रकाश टाकला.

संत गाडगे बाबा, छत्रपती शिवाजी महाराज यांचे मूर्तीपूजन, प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन आणि शंखनाद करुन महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते शुभम पाचखंडे लिखीत पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. प्रास्ताविकातून डॉ. वैभव मस्के यांनी कार्यक्रमामागील भूमिका विषद केली. सूत्रसंचालन प्रा. आदित्य पुंड यांनी, तर आभार डॉ. श्रीकांत पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच आजीवन अध्ययन विभागातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




शुभम पाचखंडे लिखित पुस्तकाचे विमोचन करतांना मान्यवर

# विद्यापीठात बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात; निरोगी आरोग्यासाठी योग आवश्यक - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

'आजच्या बदलत्या सामाजिक वातावरणात आणि कौटुंबिक वास्तव पाहता, आपले आरोग्य सुदृढ ठेवणे हे सर्वांत मोठे आव्हान आहे. म्हातारपण सुखाचे आणि निरोगी जाण्यासाठी आरोग्याची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे असून, त्यासाठी प्रत्येकाने योगाभ्यासाची कास धरली पाहिजे,' असे आवाहन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.विद्यापीठाच्या 'आजीवन अध्ययन व विस्तार विभाग', 'एम.ए. योगशास्त्र' व 'पी.जी. डिप्लोमा योगा थेरपी' यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग परिसरात बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि योगप्रेमींच्या उत्स्फूर्त उपस्थितीत साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आंतरराष्ट्रीय योग प्रशिक्षक डॉ.सुप्रिया चकोले, शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या डॉ.निता गिरी, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे,आजीवन अध्ययन व विस्तारचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

**बदलत्या सामाजिक परिस्थितीवर प्रकाश**

विदर्भातील कौटुंबिक वास्तवावर भाष्य करताना कुलगुरू पुढे म्हणाले की, आज शिक्षणाच्या आणि नोकरीच्या निमित्ताने तरुण पिढी मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये स्थायिक होत आहे,तर त्यांचे वृद्ध आई-वडील अमरावती, नागपूरसारख्या शहरांमध्ये मागे राहत आहेत. या बदललेल्या वातावरणात आरोग्याच्या नव्या समस्या निर्माण होत आहेत. भारताला लाभलेली योगाची प्राचीन ज्ञान परंपरा अत्यंत समृद्ध आहे. त्यामुळे आजच्या योग दिनानिमित्त शिकलेले प्राणायाम आणि योगासने केवळ आजच्या दिवसापुरते मर्यादित न ठेवता प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात नियमितपणे अंतर्भूत करणे गरजेचे आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा उपक्रम सुरू केल्यामुळे भारतीयांचे आरोग्य सुदृढ करण्यासाठी फार मोठा हातभार लागला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**तज्ज्ञांकडून कठीण योगासनांचे सोपे धडे**

या योग शिबिरात पुणे येथील आंतरराष्ट्रीय योग चिकित्सक व योग तज्ज्ञ डॉ. सुप्रिया चकोले यांनी मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी अत्यंत कठीण वाटणारी योगासने अतिशय सोप्या आणि सहज पद्धतीने करून घेतली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित सर्व अधिकारी, शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी योगाचे महत्त्व आत्मसात केले.कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने झाली.त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते संत गाडगे बाबा व महर्षि पतंजली यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थितांचे स्वागत रोपटे देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अनघा देशमुख यांनी, तर आभार प्रदर्शन श्री राजेश पिदडी यांनी करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रचित भजन गायीले. हा संपूर्ण सोहळा यशस्वी करण्यासाठी आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विद्यापीठातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि अमरावतीमधील योगप्रेमी नागरिक उपस्थित होते.

योगासने करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर मान्यवर










योगासने करतांना ...












## विद्यापीठाच्या उभारणीमध्ये कर्मचा-यांचाही सहभाग - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

# विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचा-यांना सन्मानपूर्वक निरोप



कर्तव्यपूर्ती सोहळा प्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

कोणत्याही संस्थेच्या उभारणीमध्ये, विकासामध्ये कर्मचा–यांचा मोठा सहभाग असतो. तनमनाने काम करणारे कर्मचारी मिळणे हे भाग्यच, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा–यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, उपकुलसचिव श्री विक्रांत मालवीय, सत्कारमूर्ती श्री अजय देशमुख, सौ. देशमुख, श्री भिमराव वाठोरे, सौ. वाठोरे, श्री अनिल चौधरी, सौ. चौधरी, श्री गजानन वराडे, सौ. वराडे, श्री मोरेश्वर मुंजाळे, सौ. मुंजाळे तसेच जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे महासचिव श्री नरेंद्र घाटोळ उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले, आपण आपल्या संस्थेसाठी आणखी काय करू शकतो, जेणेकरुन जागतिक स्तरावर आपल्या संस्थेचा नावलौकीक वाढेल, याचाही विचार आपण सर्वांनी केला पाहिजे. आपल्या कुटुंबाप्रमाणे आपल्या संस्थेप्रती सुध्दा आपली भूमिका असावी. प्रदिर्घ सेवा दिलेल्या कर्मचा–यांनी त्यांच्या अनुभवाचा लाभ आपल्या संस्थेला द्यावा असे आवाहन करुन कुलगुरूंनी सर्व सत्कारमूर्तींना पुढील आयुष्याच्या शुभेच्छा दिल्यात. यावेळी कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व सत्कारमूर्तींचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन, तर सौ. देशमुख यांचा सौ. प्रज्ञा बोंडे, सौ. वाठोरे यांचा डॉ. सुलभा पाटील, सौ. चौधरी यांचा सौ. मोनाली तोटे पाटील, सौ. वराडे यांचा सौ. रजनी चपाटे, सौ. मुंजाळे यांचा सौ. मिनल मालधुरे यांनी साडी–चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.



प्रमुख अतिथी व्य.प.सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी विचार व्यक्त करतांना

प्रमुख अतिथी डॉ. प्रवीण रघुवंशी म्हणाले, इंदिरा गांधी राष्ट्रीय पर्यावरण पुरस्कार प्राप्त करणारे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ आहे आणि यात उद्यान विभागाचा मोठा वाटा आहे. विद्यापीठाच्या विस्तारलेल्या परिसरामध्ये पर्यावरण संवर्धन ही मोठी आव्हानाची बाब होती व ती विद्यापीठाच्या उद्यान विभागाने यशस्वीपणे पार पाडली असे सांगून त्यांनी सर्व सत्कारमूर्तींना निरामय आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यापीठ कर्मचारी संघाचे महासचिव श्री नरेंद्र घाटोळ यांनी आपल्या मनोगतातून सर्व सत्कारमूर्तींच्या कार्याला उजाळा देत पुढील आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. तर सत्कारमूर्ती श्री अजय देशमुख, श्री भिमराव वाठोरे, श्री अनिल चौधरी, श्री गजानन वराडे, श्री मोरेश्वर मुंजाळे यांनी आपल्या मनोगतातून सेवाकाळात सहका–यांकडून मिळालेला आदरभाव, स्नेह याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त केले.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष श्री राजेश एडले, सदस्य डॉ. नितीन कोळी, डॉ. साक्षी ठाकुर तसेच पदाधिका–यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश देऊन सत्कार केला. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



कार्यक्रमाला उपस्थित विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी,कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्य



प्रभारी उद्यान अधीक्षक श्री भिमराव वाठोरे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते व इतर मान्यवर



कनिष्ठ सहायक श्री अजय देशमुख यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर मान्यवर



वरिष्ठ सहायक श्री अनिल चौधरी यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर मान्यवर



कनिष्ठ सहायक श्री गजानन वराडे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर मान्यवर



चौकीदार श्री मोरेश्वर मुंजाळे यांचा उभयता सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर मान्यवर

# आण्विक निदान: संसर्गजन्य रोगांविरूद्धच्या लढ्यातील एक शक्तिशाली शस्त्र

**कोविड-१९ च्या महामारीने जगाला एक महत्त्वाचा धडा शिकवला:**

वेळेवर आणि अचूक निदान केल्याने लोकांचे प्राण वाचू शकतात. कोविड-१९, क्षयरोग, डेंग्यू, हिपॅटायटीस, इन्फ्लूएंझा किंवा इतर कोणतेही नवीन उद्‌भवणारे संसर्ग असोत, रोगाची त्वरित ओळख पटवणे हे प्रभावी उपचार आणि प्रतिबंधाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. या संदर्भात, मॉलिक्युलर डायग्नोसिस (आण्विक निदान) ही आधुनिक आरोग्य सेवेतील सर्वात महत्त्वाची प्रगती म्हणून समोर आली आहे.

**मॉलिक्युलर डायग्नोसिस म्हणजे काय?**

सोप्या शब्दात सांगायचे तर, मॉलिक्युलर डायग्नोसिस ही एक प्रयोगशाळेतील पध्दत आहे, जी विषाणू, जीवाणू, बुरशी आणि परजीवी यांसारख्या रोग पसरवणाऱ्या सूक्ष्मजीवांचे अनुवांशिक साहित्य शोधून काढते. केवळ लक्षणांवरून अंदाज लावण्याऐवजी किंवा प्रयोगशाळेत सूक्ष्मजीवांची वाढ होण्याची वाट पाहण्याऐवजी, मॉलिक्युलर चाचण्या थेट संसर्गाची उपस्थिती अत्यंत अचूकतेने ओळखू शकतात.आरटी-पीसीआर ही सर्वात व्यापकपणे ओळखली जाणारी मॉलिक्युलर चाचणी आहे, जिचा वापर कोविड-१९ च्या महामारी दरम्यान मोठ्या प्रमाणावर करण्यात आला होता. ही चाचणी जगभरातील लोकांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाली. या चाचणीने लाखो लोकांचे प्राण वाचवले.

**मॉलिक्युलर डायग्नोसिस का महत्त्वाचे आहे?**

लवकर निदान झाल्याने प्राण वाचतात.अनेक संसर्गजन्य आजारांची सुरुवात ताप, खोकला, डोकेदुखी किंवा अंगदुखी यांसारख्या सामान्य आजारांसारख्या लक्षणांनी होते. मॉलिक्युलर चाचण्या संसर्गाच्या सुरुवातीच्या टप्प्यातही त्याचे नेमके कारण शोधू शकतात, ज्यामुळे डॉक्टरांना उशीर न करता योग्य उपचार सुरू करणे शक्य होते. पारंपारिक निदान पद्धतींमुळे काहीवेळा संसर्ग ओळखता येत नाही किंवा त्यांचे निष्कर्ष अनिर्णित असू शकतात. मॉलिक्युलर तंत्रज्ञान अत्यंत संवेदनशील असते आणि ते रोगजंतूंचे अगदी कमी प्रमाण देखील शोधू शकते, ज्यामुळे चुकीच्या निदानाची शक्यता कमी होते. उपचारांचे जलद निर्णय. जेव्हा डॉक्टरांना हे नक्की ठाऊक असते की कोणत्या सूक्ष्मजीवामुळे आजार झाला आहे, तेव्हा ते सर्वात प्रभावी उपचार सुचवू शकतात. यामुळे अनावश्यक औषधोपचार टाळता येतात आणि रुग्णाच्या प्रकृतीत वेगाने सुधारणा होते.

संसर्गजन्य घटकांची (*infectious agents*) जलद ओळख पटल्यामुळे आरोग्य अधिकाऱ्यांना साथीचे आजार रोखण्यासाठी वेळेवर उपाययोजना करणे सोपे जाते. लवकर निदान झाल्यामुळे संक्रमित व्यक्तींवर वेळीच उपचार होऊ शकतात आणि ते आवश्यक ती खबरदारी घेऊ शकतात, ज्यामुळे कुटुंबे आणि समाजामध्ये आजार पसरण्याचा धोका कमी होतो. जगभरात सातत्याने नवीन संसर्गजन्य आजार उद्‌भवत असतात. मॉलिक्युलर डायग्नोस्टिक तंत्रज्ञान शास्त्रज्ञांना नवीन रोगजंतूंची वेगाने ओळख पटवण्यास मदत करते, ज्यामुळे सार्वजनिक आरोग्य यंत्रणेला त्वरित प्रतिसाद देणे आणि वेगाने लस विकसित करणे शक्य होते.

**दैनंदिन आरोग्य सेवेतील उपयोग**

मॉलिक्युलर डायग्नोसिसचा वापर आता विविध प्रकारच्या आजारांसाठी केला जातो, ज्यामध्ये खालील आजारांचा समावेश आहे: कोविड-१९ , क्षयरोग , हिपॅटायटीस बी आणि हिपॅटायटीस सी, एचआयव्ही संसर्ग, डेंग्यू ताप, इन्फ्लूएंझा आणि श्वसनाचे संसर्ग, ह्युमन पॅपिलोमाव्हायरस, विविध प्रकारचे जीवाणू आणि बुरशीजन्य संसर्ग, हे तंत्रज्ञान आता भारतातील रुग्णालये, निदान प्रयोगशाळा आणि संशोधन केंद्रांमध्ये वाढत्या प्रमाणात उपलब्ध होत आहे.

**समाजासाठी फायदे**

अचूक निदानामुळे केवळ वैयक्तिक रुग्णांनाच फायदा होतो असे नाही, तर यामुळे आरोग्य व्यवस्था देखील बळकट होते. हे अँटीबायोटिक्सचा अनावश्यक वापर कमी करते, रोगांच्या साथीवर लक्ष ठेवण्यास मदत करते, लसीकरण मोहिमांना

पाठबळ देते आणि सार्वजनिक आरोग्य नियोजनात सुधारणा करण्यास हातभार लावते. भारतासारख्या देशामध्ये, जेथे संसर्गजन्य आजार हे अजूनही आरोग्यापुढील एक मोठे आव्हान आहे, तिथे मॉलिक्युलर डायग्नोस्टिक्स आजारांच्या निरीक्षणात सुधारणा करण्यासाठी आणि वेळेवर वैद्यकीय उपचार सुनिश्चित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

विशेषतः कोविड–१९ च्या महामारीनंतर भारताने मॉलिक्युलर डायग्नोस्टिक सुविधा विकसित करण्यात लक्षणीय प्रगती केली आहे. आरोग्य क्षेत्रातील वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी विद्यापीठे, वैद्यकीय संस्था आणि संशोधन केंद्रे कुशल व्यावसायिकांना प्रशिक्षित करत आहेत आणि प्रगत प्रयोगशाळा स्थापन करत आहेत. हे तंत्रज्ञान अधिक परवडणारे आणि सुलभ होत असल्याने, मॉलिक्युलर डायग्नोसिस हा आरोग्य सेवेचा एक नियमित भाग बनेल आणि त्याचा फायदा लाखो लोकांना होईल अशी अपेक्षा आहे.

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे पी. जी डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शियस डिसीजेस अभ्यासक्रम सुरू**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या पुढाकाराने विविध प्राधिकारिणींच्या मान्यतेने आरोग्य क्षेत्रात करिअरसाठी सज्ज व्यावसायिक घडवण्यासाठी पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॉलिक्युलर डायग्नोसिस ऑफ इन्फेक्शियस डिसीजेस (संसर्गजन्य आजारांचे मॉलिक्युलर निदान यातील पदव्युत्तर पदविका) हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. विद्यापीठाच्या प्रगत सेंटर फॉर मॉलिक्युलर डायग्नोसिस अँड रिसर्च द्वारे संचलित हा विशेष अभ्यासक्रम, शैक्षणिक लाईफ सायन्सेस (जीवन विज्ञान) आणि सध्या मोठ्या प्रमाणावर मागणी असलेल्या क्लिनिकल डायग्नोस्टिक्स (वैद्यकीय निदान क्षेत्र) मधील दरी सांधण्याचे काम करेल.

जागतिक आरोग्य यंत्रणा साथीच्या आजारांचा मुकाबला करण्यासाठी आणि रुग्णांच्या गुंतागुंतीच्या उपचारांचे व्यवस्थापन करण्यासाठी वेगाने आणि अचूकपणे केल्या जाणाऱ्या अनुवांशिक ओळखीवर अधिकाधिक अवलंबून आहे. पारंपारिक चाचणी पध्दतींची जागा आता हाय–थ्रुपुट मॉलिक्युलर वर्कफ्लो (उच्च क्षमतेच्या अत्याधुनिक मॉलिक्युलर कार्यपध्दती) घेत आहेत. हा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमथेट बाजारातील गरजांशी सुसंगत आहे, ज्यामुळे पदवीधरांना आधुनिक निदान प्रयोगशाळा, सार्वजनिक आरोग्य संस्था आणि फार्मास्युटिकल (औषध निर्माण) संशोधन केंद्रांमध्ये स्पर्धात्मक आघाडी मिळते.

हा अभ्यासक्रम सर्वसमावेशक प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यासाठी विशेष पायाभूत सुविधांचा वापर करतो. विद्यार्थी केवळ पुस्तकी सिध्दांतांपलीकडे जाऊन उद्योगासाठी आवश्यक असलेल्या प्रमाणित कार्यपध्दतींमध्ये प्राविण्य मिळवतात. ज्यामध्ये प्रगत प्रयोगशाळा जैवसुरक्षा, कडक जैवसुरक्षा पातळीचे व्यवस्थापन, निर्जंतुक नमुने गोळा करण्याचे तंत्र आणि नमुन्यांच्या अचूक साठवणुकीचे व्यवस्थापन यात प्राविण्य, न्यूक्लिक ॲसिड तंत्रज्ञान डी.एन.ए. आणि आर.एन.ए. काढण्यासाठी मॅन्युअल आणि ऑटोमेटेड दोन्ही कार्यपध्दतींचा सर्वसमावेशक प्रत्यक्ष अनुभव , रिअल–टाइम पीसीआर आणि आरटी–पीसीआर, विविध प्राइमर केमिस्ट्री, थर्मल सायकल्स आणि व्हायरल लोडचे प्रमाण मोजण्याचे सखोल प्रात्यक्षिक ज्ञान, डेटा विश्लेषण आणि साथीच्या आजारांचा मागोवा घेणे, रुग्णांच्या निदान प्रणालीचे विश्लेषण, गुणवत्ता नियंत्रण तपासणी आणि विषाणूंच्या बदलत्या स्वरूपाचा मागोवा घेण्याचे सखोल प्रशिक्षण.

**करिअरच्या संधी आणि उद्योगातील मागणी**

या अभ्यासक्रमाचे पदवीधारक सरकारी आणि खाजगी लाईफ सायन्स (जीवन विज्ञान) क्षेत्रातील विविध प्रकारच्या तत्काळ उपलब्ध नोकऱ्यांसाठी सज्ज होतात, जसे की, मॉलिक्युलर डायग्नोस्टिक्स स्पेशालिस्ट, मेट्रोपोलिस लॅब्स किंवा अपोलो डायग्नोस्टिक्स सारख्या कॉर्पोरेट प्रयोगशाळांच्या जाळ्यांमध्ये काम करणे, रिसर्च असोसिएट, प्रगत वैद्यकीय चाचणी केंद्र, किंवा विद्यापीठांच्या मुख्य संशोधन सुविधांमध्ये संशोधन सहाय्यक म्हणून कार्य करणे. तांत्रिक सल्लागार, जागतिक बायोटेक कंपन्यांसाठी मॉलिक्युलर उपकरणांच्या उत्पादन विक्री आणि लॉजिस्टिक व्यवस्थेचे व्यवस्थापन करणे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी, प्रादेशिक पातळीवर पसरणाऱ्या आजारांचा मागोवा घेणे किंवा आरोग्याच्या आणीबाणीच्या काळात राज्य रोगराई नियंत्रण पथकांना मदत करणे.

**संस्थात्मक उत्कृष्टता सीएमडीआरचा फायदा: कोविड महामारीच्या काळातील अनुभव**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची निवड करणे म्हणजे एका अग्रगण्य संस्थेत शिक्षण घेणे होय. या

विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाची पूर्ण मान्यता आहे. कोविड–१९ महामारीच्या काळात, विद्यापीठ आणि जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने विद्यापीठ आवारात कोविड–१९ मॉलिक्युलर डायग्नोस्टिक लॅबोरेटरी (आण्विक निदान प्रयोगशाळा) म्हणून सीएमडीआरची स्थापना करण्यात आली. अमरावतीमधील आयसीएमआर द्वारे संनियंत्रित केलेली ही एकमेव शासकीय मान्यताप्राप्त प्रयोगशाळा आहे. या प्रयोगशाळेने आतापर्यंत ५ लाखांपेक्षा जास्त नमुन्यांची तपासणी केली असून, कोविडच्या दुसऱ्या लाटेदरम्यान दररोज ३००० नमुन्यांची तपासणी करण्याची या प्रयोगशाळेची क्षमता होती. ही प्रयोगशाळा आता इतर श्वसनसंस्थेशी संबंधित विषाणूंचीही तपासणी करते.

विद्यापीठातील सीएमडीआर उत्कृष्ट शैक्षणिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असून अत्याधुनिक उपकरणे, मोठ्या वैद्यकीय केंद्रांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अचूक निदान प्रणालींवर थेट काम करण्याची संधी या ठिकाणी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना नॉलेज रिसोर्स सेंटर, विस्तृत शैक्षणिक ग्रंथालये आणि कॅम्पसवरील हक्काच्या हॉस्टेल (वसतिगृह) सुविधेचा पूर्ण लाभ मिळेल. याशिवाय अनुभवी मार्गदर्शक, आंतरराष्ट्रीय संसर्गजन्य रोग संशोधनाचा दांडगा अनुभव असलेल्या वरिष्ठ लाईफ–सायन्स प्राध्यापकांच्या थेट मार्गदर्शनाखाली अभ्यास करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळेल.

**प्रवेशासंबंधी माहिती**

या अभ्यासक्रमासाठी मायक्रोबायोलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, झूलॉजी, बायोकेमिस्ट्री, जेनोमिक सायन्सेस, ॲग्रीकल्चर, व्हेटर्नरी सायन्सेस, फिशरीज सायन्सेस, फार्मसीमध्ये प्रथम श्रेणीसह एम.एस्सी. पदवी किंवा बायोटेक्नॉलॉजीमध्ये एम.टेक. किंवा एमबीबीएस, बीडीएस अथवा वैद्यकीय विद्याशाखेतील कोणतीही पदवी धारण केलेले उमेदवार पात्र आहेत. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांनी प्रवेशाचे सविस्तर वेळापत्रक, अर्ज करण्याची पध्दत आणि शुल्काचा तपशील यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अधिकृत पोर्टलला भेट द्यावी किंवा dir.cmdr@sgbau.ac.in या ई–मेलवर थेट विभागाशी संपर्क साधावा. तरी ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांनी ऑनलाईन अर्ज https://sgbauadm.samarth.edu.in वर करून आपला प्रवेश आधीच निश्चित करावा. या केंद्राचे संचालक म्हणून डॉ. प्रशांत ठाकरे तर उपसंचालक डॉ. नीरज घनवटे आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्याशी संपर्क साधता येईल.

लेखक



डॉ. प्रशांत ठाकरे



डॉ. नीरज घनवटे




विद्यापीठातील निसर्गरम्य परिसर....

# विश्वास, गुणवत्ता, ज्ञान व माहिती प्रसार, निरंतरतेची ४ वर्षे



























# विश्वास, गुणवत्ता, ज्ञान व माहिती प्रसार, निरंतरतेची ४ वर्षे


























# विश्वास, गुणवत्ता, ज्ञान व माहिती प्रसार, निरंतरतेची ४ वर्षे



























# विश्वास, गुणवत्ता, ज्ञान व माहिती प्रसार, निरंतरतेची ४ वर्षे



























# विश्वास, गुणवत्ता, ज्ञान व माहिती प्रसार, निरंतरतेची ४ वर्षे



























# विश्वास, गुणवत्ता, ज्ञान व माहिती प्रसार, निरंतरतेची ४ वर्षे





















विद्यापीठ ई–विद्यावार्ता मासिकाला चार वर्ष पुर्ण झाल्यानिमित्त जनसंपर्क विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच डिझाईनर श्री. गवई व श्री. प्रल्हाद खांडेकर यांचा मा. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सत्कार केला.



# विद्यापीठात छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी



छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व छत्रपती राजर्षि शाहू महाराज यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



# विद्यापीठात महाराणा प्रताप यांची जयंती साजरी



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात राष्ट्रगौरव, शूरवीर, महापराक्रमी महाराणा प्रताप यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, अधीक्षक डॉ. धनंजय पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व महाराणा प्रताप यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची पुण्यतिथी संपन्न



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति संशोधन केंद्रामध्ये ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांची पुण्यतिथी संपन्न झाली. याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. पुण्यतिथी कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, उपकुलसचिव (विधी) श्री मंगेश जायले, डॉ. श्रीकांत जिचकार स्मृति केंद्राचे प्रभारी संचालक डॉ.एस.पी. जोशी तसेच विद्यापीठातील कर्मचारी उपस्थित होते.



The Hitavada



Vice-Chancellor Dr Milind Barhate and others after offering tributes to Veer Savarkar.

# SGBAU pays tributes to Veer Savarkar

■ Amravati Bureau
AMRAVATI, June 1

THE birth anniversary of Swatantryaveer Savarkar was celebrated at Sant Gadge Baba Amravati University with reverence.

Dr Milind Barhate, Vice-Chancellor, paid tributes to Veer Savarkar by offering flowers and garlanding at the portrait on behalf of the University.

officers and staff members were present for the programme. Dr Vilas Nandurkar, Public Relations Officer conducted the programme and also shared information about the life and contributions of Veer Savarkar.

The Hitavada



Dr Milind Barhate, Dr Avinash Asnare, Mangesh Varkhede and others taking part in the campaign.

# SGBAU observes 'No Vehicle Day'

■ Amravati Bureau
AMRAVATI, June 4

RESPONDING to the special appeal made by Narendra Modi, Prime Minister and Devendra Fadnavis, Chief Minister, Sant Gadge Baba Amravati University (SGBAU) observed a 'No Vehicle Day' with great enthusiasm and commitment, recently. The initiative was aimed at promoting environmental sustainability, reducing pollution and encouraging the use of eco-friendly modes of transportation.

Leading the campaign, V-C Dr Milind Barhate, set an example by commuting from his residence to the university campus on an e-bike. His participation inspired university officers, faculty members, staff and students to actively support the initiative.

Several senior university officers, including Dr Avinash Asnare, Registrar, Pushkar Deshpande, Finance and Accounts Officer, Dr Rajiv Borkar, Director of Student Development, Dr Nilesh Kadu, NSS Director, Shashikant Rode, Executive Engineer, Mangesh Varkhede and Dr Dadarao Chavan, both the Deputy Registrars, Dr Vilas Nandurkar, Public Relations Officer and other officers, reached the campus using bicycles and other eco-friendly modes of transport.

The university campus witnessed a significant reduction in vehicular movement throughout the day. Instead of the usual traffic noise and emissions, the atmosphere reflected a collective commitment to environmental conservation.

Speaking on the occasion, Dr Barahate said that, the PM and CM's call should not remain limited to a single day but should become a part of everyday life. He emphasised that such initiatives are essential for reducing pollution and ensuring a healthier environment for future generations. He also appreciated the enthusiastic participation of the university community.

Faculty members, administrative staff, non-teaching employees, and students participated in large numbers. Many opted for public transport, bicycles and e-bikes, while others adopted carpooling practices.

The initiative has received widespread appreciation from educational circles and citizens alike, with many describing it as a model for other institutions to follow.

Meanwhile, Dr Barhate, appealed to principals of all colleges affiliated with SGBAU to observe a 'No Vehicle Day' on one Saturday every month. He urged educational institutions to encourage teachers, staff and students to participate actively in such environmental initiatives and contribute to the nation's sustainable development efforts.

प्रतिदिन अखबार

# क्रांक्रीटीकरण के युग में पर्यावरण संवर्धक संत गाडगे बाबा विद्यापीठ







फोटो - जय स्टूडियो, अमरावती.



## विश्व पर्यावरण दिवस पर विशेष | 470.63 एकड़ परिसर की हरियाली मनुष्य जाति और वन्यजीवों के लिए वरदान

प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार
अमरावती, 4 जून - 21वी सदी में विकास के नया आयाम स्थापित होने लगे हैं. तकनीकी विकास और मशीनरी का जाल मनुष्य को भी मशीन की तरह भगा रहा है. लेकिन इस कांक्रीटीकरण के युग में हम अपने ही अस्तित्व से जुड़े अविभाज्य घटक पर्यावरण को ही भूलते जा रहा है. जिस पर्यावरण ने जीवनदान देकर जीना सिखाया. उस पर्यावरण के प्रति कृतज्ञता व्यक्त करने की बजाय अब मनुष्य जाति ही इस पर्यावरण का नाश करने तुली है. लेकिन शहर का एक ऐसा परिसर है जो इस कांक्रीटीकरण के युग में आज भी अपने संपन्न पर्यावरण धनसंपदा के साथ शहर एवं परिसर की हरियाली तथा उससे बने रिश्ते को आज भी कायम रखे हुए हैं. हम बात कर रहे हैं-470.63 एकड़ परिसर में बने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ की. जो इस विश्व पर्यावरण दिवस पर पर्यावरण संवर्धन की मिसाल कायम करता है.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ एक शैक्षणिक स्थल है, जहां प्राकृतिक वातावरण में बच्चों को पढ़ाई में अत्याधिक आनंद की अनुभूति हो, छात्र प्रकृति के सानिध्य



में पढ़ाई कर पाएं, इसके लिए 1 मई 1983 में संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ की स्थापना की गई. समय के साथ इस परिसर का विकास किया गया. यह परिसर जंगल क्षेत्र से जुड़ा था. जिसके कारण शुरूआत से ही इस परिसर में जंगली जानवरों का बसेरा रहा है. समय के साथ विद्यापीठ परिसर में लोगों की आवाजाही बढ़ने से जानवरों की उपस्थिति घटने लगी लेकिन आज भी यहां जंगली जानवर जैसे तेंदुआ, हिरन, गवा, मोर-लाडोर, कई वन्य प्राणी आसानी से देखने को मिल सकते हैं.

### 470.63 एकड में फैला है विद्यापीठ परिसर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ का संपूर्ण परिसर 470.63 एकड में बना है, लेकिन विद्यापीठ परिसर में आप जैसे ही प्रवेश करते हैं तो सबसे पहले हरे-भरे पेड़ आपका स्वागत करते हैं. प्रवेश से लेकर अंतिम छोर तक जहां नजर डालेंगे वहां आपको केवल पेड़ ही पेड़ नजर आयेंगे. खास बात यह है कि इन पेड़ों पर नाम के साथ हर पेड़ पर एक संदेश फलक लगाया गया है. जो यह दर्शाता है कि हमें किस प्रकार अपने पर्यावरण का संवर्धन कर पेड़ों की निगाह रखनी चाहिए.

### विद्यापीठ निधि से खर्च होते प्रति वर्ष 1 करोड़

समय के साथ तापमान का पारा बढ़ रहा है. ऐसे में वन्यजीव, पौधों का जतन करना भी उतना ही जरुरी है. 47 डिग्री के तापमान में अगर आप सुकून के कुछ पल बिताना चाहते हैं तो संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ का पर्यावरण पूरक परिसर आपके लिए डेस्टीनेशन साबित हो सकता है. लेकिन इस डेस्टीनेशन के मेन्टेन्स के लिए प्रशासन हर वर्ष उद्यान विभाग के माध्यम से कर्मचारी वेतन, देखभाल, पेडों की कटाई के लिए मशीनरी व अन्य कामकाज के लिए करीब 1 करोड़ रुपये की राशि खर्च करती है. विद्यापीठ को आय के अन्य साधन न रहने से यह केवल छात्रों द्वारा भरी जाने वाली फीस की आय व शासन अनुदान से ही खर्च होती है. यानि विद्यापीठ जिनसे लेती है, पर्यावरण के माध्यम से उन्हें ही लौटाती है. इस कारण हर दिन यहां कुछ समय का सुकुन पाने के लिए लोग मॉर्निंग वॉक के लिए इस परिसर का भ्रमण कर ताजी हवा पाने की कोशिश करते हैं.

### 80 एकड़ में बने तालाब व बांध ही जीवन का आधार

